<u>जाहिर प्रकटन</u>

**पुणे महानगरपालिका**

**समाज विकास विभाग**

**सन २०२०–२०२१**

**दिव्यांग नागरिक, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक मोफत बसपास योजना**

सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना पी.एम.पी.एम.एल. मोफत बस पास (मी कार्ड) स्मार्ट कार्डाच्या स्वरूपात देण्याची योजना सुरू आहे. यासाठी पुणे महानगरपालिका हद्दीमधील शारिरीक व मानसिकदृष्टया विकलांग, अंध, अपंग, मतीमंद, मुकबधीर नागरिकांकडून व केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ऑनलाईन भरणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या dbt.punecorporation.org या अधिकृत संकेतस्थळावरती सुविधा उपलब्ध करणेत आलेली आहे.

## <u>नियम व अटी</u>

१. पुणे महानगरपालिका हद्दीमधील ३ वर्षे वास्तव्य असलेले दिव्यांग नागरिक, केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळालेले व स्वातंत्र सैनिक यांनीच अर्ज करावेत.

२. केंद्र व राज्य शासन यांचेकडून विशेष प्राविण्य (राष्ट्रपती पदक, शौर्य पदक इ.) मिळाल्याचे प्रमाणपत्र व स्वातंत्र सैनिक असल्यास अपलोड करणे आवश्यक आहे.

३. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे. तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

४. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.

५. मे. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारी नुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा दाखला तसेच शासन वेळोवेळी जे बदल सुचवतील त्या प्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.

६. आधार कार्ड झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. **दि.११ डिसेंबर २०२० ते दि.२९ जानेवारी २०२१ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ०५.३० पर्यत ऑनलाईन अर्ज विनामूल्य भरण्याची सुविधा त्या त्या कार्यक्षेत्रातील क्षेत्रिय कार्यालयामध्ये करणेत आली आहे.**

८. सदर योजनांकरीता आवश्यक तेथील अर्जदाराची स्वाक्षरी या पानाची संगणक प्रणालीतून प्रिंट काढून अर्जदाराची स्वाक्षरी घेवून सदर कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

९. ऑनलाईन पद्धतीने आलेल्या अर्जांची तपासणी करून पात्र लाभार्थ्यांचे पासेस (मी कार्ड) पी.एम.पी.एम.एल.कडून तयार करून झाल्यानंतर त्यांचे मार्फत सेंट्रल कन्ट्रोल सेंटर, तळमजला, स्वारगेट, पुणे ३७ येथे वाटप करणेत येईल.

१०. लाभार्थ्यांने वरिल प्रमाणे नमुद केलेल्या योजने करिता व नियम व अटी प्रमाणे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

**टिप :– पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयामध्ये शारिरीक व मानसिकदृष्टया विकलांग, अंध, अपंग, मतीमंद, मुकबधीर नागरीकांच्या नोंदी करणेकरीता रजिस्टर ठेवण्यात आले आहे. या रजिस्टर मध्ये ज्यांनी नोंद केली नाही अशा दिव्यांग नागरीकांनी आपल्या जवळच्या क्षेत्रिय कार्यालयामध्ये नोंदणी करावी.**

**Sd/-**

**उप आयुक्त**

समाज विकास विभाग

पुणे महानगरपालिका